- प्रकरण तिसरे -

- शेतमजुरांची प्राथमिक माहिती -

३·१·१ :

शेतमजुरांची आर्थिकस्थिती जाणून घेण्यासाठी केलेल्या या पहाणीत कामेरी गावातील १२० शेतमजुरांचे सर्वेक्षण करण्यात आले, या सर्वेक्षणातील शेतमजुरांची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती या प्रकरणात मांडलेली आहे· या माहितीच्या विश्लेषणातून कामेरी गावातील - शेतमजुरांच्या बाबतीत विविध अंगाचा परिचय होतो· सर्वेक्षण केलेल्या १२० शेतमजुरांपैकी ९३ (७७·५ टक्के) अल्पभूधारक,२२ (१८·३३ टक्के) भूहीन व ५(४·१७ टक्के) खंडकरी शेतमजूर आहेत·

३·१·२ : शेतमजुरांचे जन्मगाव :

सर्व अल्पभूधारक व खंडकरी शेतमजूर कामेरी या गावातले आहेत· बावीस भूहीन शेतमजुरापैकी एका (४·५५ टक्के) मजुराचे जन्मगाव वाकुर्डे आहे· हे गाव कामेरी गावापासून ३० कि·मी·अंतराव आहे· म्हणजेच - सर्वेक्षण केलेल्या १२० पैकी ११९ (९९·१७ टक्के) शेतमजूर कामेरी गावचेच आहेत·

३·१·३ : लिंगभेदानुसार वर्गीकरण :

मुलाखातीसाठी निवडलेलया ९३ अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये ८९ (९५·७ टक्के) पुरूष कर्ते व ४ ( ४·३ टक्के ) स्त्रीया होत्या· भूहीन शेतमजुरांमध्ये सर्व म्हणजे बावीस व खंडकरी शेतमजुरामधील सर्व म्हणजे पाच पुरुष होते· म्हणजे एकूण १२० शेतमजूरांमध्ये ११६ (९६·६७ टक्के) पुरुष व चार (३·३३ टक्के) स्त्रीया होत्या· शेतमजूर कुटुंबामध्ये स्त्री कर्त्याचे प्रमाण फारच कमी आहे·

३·१·४ : वैवाहिक स्थिती :

मुलाखात घेतलेल्या ९३ अल्पभूधारकापैकी ९० (९६·७७ टक्के) व्यक्ती विवाहीत होत्या तर तीन (३·२३ टक्के) अविवाहीत आहेत· सर्व भूहीन व खंडकरी शेतमजूर विवाहीत आहेत·

३·१·५ : शैक्षणिक स्थिती :

अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये ३७ (३९·७८ टक्के) शेतमजूर अशिक्षित तर ४५ (४८·३९ टक्के) प्राथमिक शिक्षण घेतलेले आहेत· सात (७·७३ टक्के) माध्यमिक शिक्षण घेतलेले तर चार (४·३०)टक्के कुटुंबप्रमुख उच्चशिक्षण घेतलेले आहेत·

भूहीन शेतमजुरांमध्ये सात (३१·८२ टक्के) कुटुंबप्रमुख अशिक्षीत तर पंधरा (६८·१८ टक्के) कुटुंबप्रमुख प्राथमिक शिक्षण झालेले आहेत· खंडकरी शेतमजुरांमध्ये दोन (४०·टक्के) कुटुंबप्रमुख अशिक्षीत तर तीन (६० टक्के) कुटुंबप्रमुखांचे प्राथमिक शिक्षण झालेले आहे·

एकूण १२० शेतमजूर कुटुंबामध्ये ४७ (३९·१७ टक्के) शेतमजूर कुटुंबप्रमुख अशिक्षीत, ६२ (५१·६४ टक्के) प्राथमिक,सात (५·८३ टक्के) माध्यमिक तर चार (३·३३ टक्के) शेतमजूर कुटुंबप्रमुखांचे उच्च माध्यमिक शिक्षण झाले आहे· वडिलांच्या शिक्षणाचा विचार करता फक्त ११ (९·१७ टक्के) कुटुंबप्रमुखांचे वडीलाचे शिक्षण प्राथमिक पर्यंत तर १०९ (९०·८३ टक्के) शेतमजुरांचे वडील अशिक्षीत होते·

यावरून खंडकरी शेतमजुरांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे· तर अल्पभूधारक शेतमजुरामध्ये माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण - घेतलेले शेतमजूर आहेत·

····२६/-

तक्ता क्र. ३.१

शेतमजुरांची धर्म - जातवार विभागणी

| अ.नं. | शेतमजुरांची धर्मानुसार विभागणी. | हिंदू शेतमजुरांची जातवार विभागणी | अल्पभूधारक शेतमजूर | | भूमिहीन शेतमजूर | | खंडकरी शेतमजूर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| स्तंभ क्र. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | हिंदू | - | ९० | ९६.७७ | २० | ९०.९१ | ४ | ८०.०० | ११४ | ९५.०० |
| २. | हिंदू | मराठा | ४२ | ४६.६० | १० | ५०.०० | ४ | १००.०० | ५६ | ४९.१२ |
| ३. | हिंदू | महार | १० | ११.११ | १ | ५.०० | - | - | ११ | ९.६५ |
| ४. | हिंदू | मांग | १२ | १३.१३ | ६ | ३०.०० | - | - | १८ | १५.७९ |
| ५. | हिंदू | चांभार | २ | २.२२ | १ | ५.०० | - | - | ३ | २.६३ |
| ६. | हिंदू | धानगर | ११ | १२.१२ | - | - | - | - | ११ | ९.६५ |
| ७. | हिंदू | रामोशी | १३ | १४.१४ | २ | १०.०० | - | - | १५ | १३.१६ |
| ८. | हिंदू | एकूण | ९० | १०० % | २० | १०० % | ४ | १०० % | ११४ | १०० % |
| ९. | मुस्लीम. | - | २ | २.१६ | २ | ९.०९ | १ | २०.०० | ५ | ४.१७ |
| १०. | जैन | - | १ | १.०८ | - | - | - | - | १ | ०.८३ |
| ११. | एकूण | - | ९३ | १०० % | २२ | १०० % | ५ | १०० % | १२० | १०० % |

३·१·६ : सामाजिक स्थिती :

तक्ता क्र·३·१ ची पहाणी केली असता असे आढळून येते की सर्व १२० शेतमजूर कुटुंबामध्ये ११४ (९५ टक्के) शेतमजूर कुटुंबप्रमुख हे हिंदू - धर्माचे आहेत· ५(४·१७ टक्के) कुटुंबप्रमुख मुस्लीम धर्माचे तर एक(०·८३ टक्के) कुटुंबप्रमुख जैन धर्माचे आहेत·

अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये ९० (९६·७७ टक्के) कुटुंबे हिंदु - धर्माची, दोन (२·१५ टक्के) कुटुंबे मुस्लीम धर्माची तर एक (१·०८ टक्के ) कुटुंब जैन धर्मीय शेतमजुरांची आहेत· भूहीन शेतमजुरांमध्ये वीस - (९०·९१ टक्के) कुटुंबे हिंदू धर्मीयाची तर दोन ( ९·०९ टक्के ) कुटुंबे मुस्लीम धर्मीय आहेत· खंडकरी शेतमजुरांमध्ये चार (८० टक्के) कुटुंबे हिंदू धर्मीयाची तर एक (२० टक्के) कुटुंब मुस्लीम धर्मियांची आहेत·

तक्ता ३·१ वरून हिंदू धर्मीय कुटुंबीयांची जातीनुसार वर्गीकरणाची कल्पना येते, अल्पभूधारक शेतमजुरामध्ये ९० कुटुंबे हिंदू धर्मीयांची आहेत· त्यांची जाती वर्गीकरणानुसार विभागणी करता ४२ (४६·६७ टक्के) मराठा, ११(१२·२२ टक्के) महार, १२(१३·३३ टक्के) मांग, दोन (२·२२ टक्के) - चांभार, ११(१२·२२ टक्के) धनगर तर १३(१४·४४ टक्के) रामोशी जातीच्या लोकांची कुटुंबे आहेत· भूहीन वीस हिंदू धर्मिय शेतमजुर कुटुंबामध्ये दहा ( ५० टक्के) मराठा, एक (५ टक्के) महार, सहा (३० टक्के) मांग, एक (५ टक्के) चांभार व दोन (१० टक्के) रामोशी जातीच्या लोकांची आहेत· विशेष म्हणजे खंडकरी शेतमजुरांमधील चारही कुटुंबे, मराठा या जातीची आहेत·

···· २८/-

तक्ता क्र· ३·२

शेतमजुरांची संख्या व जमीनीचे ( जिरायत ) आकारमान

| अ·नं· | शेतमजुरांच्या जमीनीचे आकारमान (आरमध्ये) | अल्पभूधारक शेतमजूर संख्या | अल्पभूधारक शेतमजूर टक्केवारी | खंडकरी शेतमजूर संख्या | खंडकरी शेतमजूर टक्केवारी | एकूण संख्या | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्तंभ क्र· | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १· | ० ते १० पर्यंत | १८ | १९·३५ | | | १८ | १८·३७ |
| २· | ११ ते २० पर्यंत | २१ | २२·५८ | १ | २०·०० | २२ | २२·४५ |
| ३· | २१ ते ३० पर्यंत | १२ | १२·९० | | | १२ | १२·२४ |
| ४· | ३१ ते ४० पर्यंत | १८ | १९·३५ | १ | २०·०० | १९ | १९·३८ |
| ५· | ४१ ते ५० पर्यंत | ३ | ३·२३ | १ | २०·०० | ४ | ४·०८ |
| ६· | ५१ ते ६० पर्यंत | १२ | १२·८० | | | १२ | १२·४५ |
| ७· | ६१ ते ८० पर्यंत | ६ | ६·४५ | | | ६ | ६·१२ |
| ८· | ८१ ते १ हेक्टर | १ | १·०८ | १ | २०·०० | २ | २·०४ |
| ९· | १·१ ते २ हेक्टर | २ | २·१५ | १ | २०·०० | ३ | ३·०६ |
| १०· | एकूण | ९३ | १०० % | ५ | १०० % | ९८ | १०० % |

( टिप :- शेतमजुरांची बागायत जमीन नाही· )

३·२·१ : जमीन :

अल्पभूधारक व छांडकरी शेतमजूर यांच्याकडे असणारे जमीनक्षेत्र तक्ता क्र· ३·२ वरून समजून येते· अल्पभूधारक व छांडकरी शेतमजूर, ९८ कुटुंबापैकी ४० कुटुंबे अशी आहेत की, ज्यांच्या वाटयाला कसण्यासाठी २० आरपेक्षा कमी जमीन आहे· ७५ कुटुंबाकडे कसण्यासाठी ५० आरपेक्षा कमी जमीन ताब्यात आहे· ९५ कुटुंबाकडे एक हेक्टरपेक्षा कमी जमीन ताब्यात आहे· म्हणजे वीस कुटुंबाकडे ५१ आर ते एक हेक्टर पर्यंत जमीन कसण्यासाठी आहे· तर फक्त तीन कुटुंबे अशी आहेत ज्यांच्याकडे एक ते दोन हेक्टरपर्यंत जमीन कसण्याकरता ताब्यात आहे·

अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये ५० आरपेक्षा कमी जमीन कसण्यासाठी ताब्यात असणाऱ्या कुटुंबांची संख्या ७२ आहे· १९ कुटुंबाच्या ताब्यात ५१ आर ते एक हेक्टरपर्यंत जमीन आहे· तर फक्त दोन कुटुंबाकडे १·१ हेक्टर ते दोन हेक्टरपर्यंत जमीन कसण्यासाठी आहे·

छांडकरी शेतमजुरांमध्ये ५० आरपेक्षा कमी जमीन कसण्यासाठी - ताब्यात असणारी तीन कुटुंबे आहेत· ५१ आर ते एक हेक्टर जमीन फक्त एक कुटुंब कसत आहे· तर एक कुटुंबाकडे १·१ हेक्टर ते दोन हेक्टर जमीन कसण्यासाठी आहे·

अल्पभूधारक व छांडकरी शेतमजूर मिळून असलेल्या एकूण ९८ - कुटुंबापैकी फक्त तीन (३·६ टक्के) शेतमजुरांकडे एक हेक्टर अथवा एक हेक्टर पेक्षा जास्त जमीन लागवडीखाली आहे तर फक्त वीस (२०·४१ टक्के ) कुटुंबाकडे ५१ आर ते एक हेक्टरपर्यंत जमीन लागवडीखाली आहे· या लहान आकारमानाच्या शेतातून कोणतीही सुधारणा करणे अशक्य दिसते·

### ३·२·२ : जिरायत व बागायत जमीन :

अल्पभूधारक व छांडकरी शेतमजुरांकडे असणारी सर्व जमीन जिरायत (कोरडवाहू) आहे· (तक्ता क्र· ३·३) असमाधानकार पाऊस, जलसिंचनाच्या इतर सोयींचा अभाव, विहिरीतून कमी पाणी उपलब्ध होणे· या सर्व कारणामुळे कामेरी गावात बागायत क्षेत्र खूपच कमी आहे·

### ३·३·१ : शेतमजुरांची गतिशीलता :

शेतमजुरांच्या गतिशीलतेचा विचार केल्यास फक्त भूहीन - शेतमजुरांपैकी एक शेतमजूर दुस-या गावचा असताना कामेरीमध्ये शेतमजूरी करतो· या भूहीन शेतमजुरांमध्ये श्रमिकांची गतिशीलता ४·५५ टक्के दिसून येते· एकूण १२० शेतमजूर कुटुंबाचा विचार करता हे गतिशीलतेचे प्रमाण फक्त ०·८३ टक्के आहे·

आंतरपिढीतील गतिशीलतेचा विचार करता भूहीन शेतमजूर कुटुंबामध्ये हे प्रमाण २२·७३ टक्के ( २२ पैकी ५) तर छांडकरी शेतमजूर कुटुंबामध्ये हे प्रमाण २० टक्के (पाच पैकी एक) आहे· अल्पभूधारक - शेतमजुरांमध्ये आंतरपिढीतील गतिशीलता शुन्य आहे· सर्व १२० शेतमजूर कुटुंबामध्ये आंतरपिढीतील गतिशीलता ५ टक्के (सहा ) आहे·

### ३·४·१ : तौलनिक साक्षरता :

अल्पभूधारक शेतमजुरामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते· कुटुंबप्रमुखांच्या वडीलांच्या शिक्षणाचा विचार केल्यास ८६ कुटुंबप्रमुखाचे वडील अशिक्षीत तर सात कुटुंबप्रमुखांच्या वडीलांचे प्राथमिक शिक्षण झाले आहे·

.... ३१/-

अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये वडील व स्वत: शेतमजुर अशिक्षीत असणाऱ्यांची संख्या ३८ (४४.१९ टक्के) आहे. शेतमजूर कुटुंबापैकी ३९ - (४५.३६ टक्के) प्राथमिक, सात (८.१४ टक्के) माध्यमिक तर उच्च-माध्यमिक शिक्षण घेणारे दोन शेतमजुरांच्या वडिलांचे मुळीच शिक्षण झालेले नाही. प्राथमिक शिक्षण झालेल्या शेतमजुरांपैकी पाच (११.३६ टक्के) शेतमजुरांच्या वडिलांचेही प्राथमीक शिक्षण झालेले होते, तसेच दोन उच्च-माध्यमिक शिक्षण झालेल्या शेतमजुरांच्या वडिलांचे प्राथमिक शिक्षण झालेले होते म्हणजे शेतमजुरांच्या आताच्या पिढीत साक्षरतेचे प्रमाण अगोदरच्या पिढीपेक्षा जास्त आहे.

भूहीन शेतमजुरांमध्ये वडील व स्वत: शेतमजूर अशिक्षीत अशा कुटुंबप्रमुखांचे प्रमाण सात (३६.८४ टक्के) आहे. वडिल अशिक्षीत व - शेतमजुरांचे प्राथमीक शिक्षण असे बाराजण (४९.४२ टक्के) आहेत. म्हणजे १९ (८६.३६ टक्के) शेतमजूर कुटुंबप्रमुखांचे वडिल अशिक्षीत तर फक्त तीन (१३.६४ टक्के) प्राथमिक शिक्षीत शेतमजुरांच्या वडिलांचे प्राथमिक शिक्षण झालेले आहे.

खांडकरी शेतमजुरांमध्ये चार (८० टक्के) अशिक्षीत वडिलांच्या मुलापैकी दोन (५० टक्के) मुले अशिक्षीत व दोन (५० टक्के) शेतमजुरांचे प्राथमिक शिक्षण झालेले आहे. तर एक (२० टक्के) प्राथमीक शिक्षीत वडिलांच्या मुलाचे (शेतमजुरांचे) प्राथमिक शिक्षण झालेले आहे.

यावरुन असा निष्कर्ष निघतो की शेतमजुरांच्या भूहीन शेतमजूर गटात शैक्षणिक प्रगती झाली आहे. परंतु तौलनिकदृष्टया अल्पभूधारकामध्ये भूहीन शेतमजुरापेक्षा साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

..... ३२/-

तक्ता ३·३

अल्पभूधारक शेतमजूरांच्या जमीन मालकीचा तुलनात्मक तक्ता

| अ.न. | शेतमजूरांच्या जमिनीचे आकारमान (आरमध्ये) | शेतमजूरांच्या वडिलाच्या जमिनीचे क्षेत्रफळ ( आर मध्ये ) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १० पर्यंत | १० ते २० | २१ ते ३० | ३१ ते ४० | ४१ ते ५० | ५१ ते ६० | ६१ ते ८० | ८१ ते १ हेक्टर | १·१ हेक्टर ते २ हेक्टर | २·१ हेक्टर पेक्षा जास्त | एकूण |
| स्तंभ क्र· | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १· | १० पर्यंत | १४<br>(७७·७८)<br>(७३·६८) | १<br>(५·५६)<br>(१२·५०) | १<br>(५·५६)<br>(१०·००) | १<br>(५·५६)<br>(७·१४) | | १<br>(५·५६)<br>(१२·५०) | | | | | १८<br>(१०० %)<br>(१९·३५) |
| २· | ११ ते २० | ३<br>(१४·२९)<br>(१५·७९) | ७<br>(३३·३३)<br>(५·५०) | ३<br>(१४·२९)<br>(३०·००) | २<br>(९·५२)<br>(१४·२९) | ३<br>(१४·२९)<br>(६०·००) | १<br>(४·७६)<br>(१२·५०) | १<br>(४·७६)<br>(१२·५०) | १<br>( ४·७६)<br>(३३·३३) | | | २१<br>(१०० %)<br>(२२·५८) |
| ३· | २१ ते ३० | | | ६<br>(५०·००)<br>(६०·००) | १<br>(८·३३)<br>(७·१४) | १<br>( ८·३३)<br>(२०·००) | १<br>(८·३३)<br>(१२·५०) | १<br>(८·३३)<br>(१२·५०) | १<br>(८·३३)<br>(३३·३३) | १<br>(८·३३)<br>( ७·१४) | | १२<br>(१०० %)<br>(१२·९०) |
| ४· | ३१ ते ४० | २<br>(११·११)<br>(१०·५३) | | | १०<br>(५५·५६)<br>(७१·४३) | | | २<br>(११·११)<br>(२५·००) | | २<br>(११·११)<br>(१४·९०) | २<br>(११·११)<br>(५०·००) | १८<br>(१०० %)<br>(१९·३५) |
| ५· | ४१ ते ५० | | | | | १<br>(३३·३३)<br>(२०·००) | १<br>(३३·३३)<br>(१२·५०) | | | १<br>(३३·३३)<br>( ७·१४) | | ३<br>(१०० %)<br>(३·२३) |
| ६· | ५१ ते | | | | | | ४<br>(३३·३३) | | १<br>(८·३३) | ७<br>(५८·३३) | | १२<br>(१०० %) |

| १. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | ८१ ते १ हेक्टर | | | | | | | | | १<br>(१०० %)<br>(७·१४) | | १<br>(१०० %)<br>(१·०७) |
| ९. | १·१ हेक्टर ते २ हेक्टर | | | | | | | | | १<br>(५०·००)<br>(७·१४) | १<br>(५०·००)<br>(२५·००) | २<br>(१०० %)<br>(२·१५) |
| १०. | एकूण | १९<br>(२०·४३)<br>(१०० %) | ८<br>(८·६०)<br>(१०० %) | १०<br>(१०·७५)<br>(१०० %) | १४<br>(१५·०५)<br>(१०० %) | ५<br>(५·३८)<br>(१०० %) | ८<br>(८·६०)<br>(१०० %) | ८<br>(८·६०)<br>(१०० %) | ३<br>(३·२३)<br>(१०० %) | १४<br>(१५·०५)<br>(१०० %) | ४<br>(४·३०)<br>(१०० %) | ९३<br>(१०० %)<br>(१०० %) |

. . . . . . . . .

## ३·५·१: शेतमजुरांकडील जमीन व वडीलांकडील जमीन यांच्या प्रमाणाची तुलना :

अल्पभू-धारक शेतमजूर कुटुंबप्रमुख व त्यांच्या वडीलांची जमीन यांची तुलना तक्ता क्र· ३·३ मध्ये दिलेली आहे· त्यावरुन असे आढळून आले आहे की, दहा आरपर्यंत स्वत:ची मालकी असणा-या १८ कुटुंबप्रमुखांमध्ये चौदा (७७·७८ टक्के) शेतमजूर असे आहेत की त्यांच्या व वडीलांच्या जमिनी सारख्या आहेत· चार (२२·२२ टक्के) शेतमजुरांच्या वडीलांची जमीन त्यांच्या जमीनीपेक्षा जास्त होती· अकरा ते वीस आरपर्यंत स्वत:च्या ताब्यात जमीन असणा-या एकवीस शेतमजुरांमध्ये तीन (१४·२९) टक्के शेतमजुरांचे जमीनक्षेत्र वडीलांच्या जमीनक्षेत्रापेक्षा जास्त आहे· सात (३३·३३ टक्के) शेतमजुरांच्या जमीनीचे क्षेत्र वडीलांचे जमीनक्षेत्र सारखेच आहे· तर अकरा (५२·३८) टक्के शेतमजुरांकडे असलेली जमीन त्यांच्या वडीलांकडे असलेल्या जमीनीपेक्षा कमी आहे·

एकवीस ते तीस आर क्षेत्राच्या गटातील बारा शेतमजुरापैकी सह ( ५० टक्के) शेतमजुरांचे जमीनक्षेत्र व वडीलांचे जमीनक्षेत्र सारखेच आहे· तर सहा (५० टक्के) शेतमजुरांचे जमीनक्षेत्र वडीलांच्या जमीनक्षेत्रापेक्षा कमी आहे·

४१ ते ५० आर या गटातील तीन शेतमजुरांपैकी एक (३३·३३ टक्के) - शेतमजुरांची जमीन व वडीलांच्या जमीनीचे क्षेत्र सारखेच आहे· तर दोन (६६·६७ टक्के) शेतमजुरांच्या जमीनीचे क्षेत्र वडीलांच्या जमीनक्षेत्रापेक्षा कमी आहे·

५१ ते ६० आर या गटातील बारा शेतमजुरापैकी चार (३३·३३ टक्के) शेतमजुरांचे जमीनक्षेत्र वडीलांच्या जमीनक्षेत्रा एवढेच आहे· तर आठ (६६·६७ टक्के) शेतमजुरांचे जमीनक्षेत्र वडीलांच्या जमीन क्षेत्रापेक्षा कमी आहे·

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

६१ ते ८० आर या जमीन गटातील सहा शेतमजुरांपैकी चार (६६·६७ टक्के) शेतमजुरांचे व वडीलांचे जमीनक्षेत्र सारखेच आहे· तर दोन (३३·३३ टक्के) शेतमजुरांचे जमीन क्षेत्र वडीलांच्या जमीनक्षेत्रापेक्षा कमी आहे·

८१ आर ते एक हेक्टर या गटातील एकुलत्या शेतमजुराचे जमीनक्षेत्र वडीलांच्या जमीनक्षेत्रापेक्षा कमी आहे·

१·१ हेक्टर ते दोन हेक्टर या गटातील दोन शेतमजुरांपैकी एक (५० टक्के) शेतमजूर व वडीलांचे जमीनक्षेत्र समान· तर एका (५० टक्के) शेतमजुरांचे जमीनक्षेत्र वडीलांच्या जमीनक्षेत्रापेक्षा कमी आहे·

सर्वसाधारणपणे विचार करता असे दिसून येते की, सर्व ९३ अल्पभू-धारक शेतमजूर कुटुंबप्रमुखांचे जमीनक्षेत्र व त्यांच्या वडीलांचे जमीनक्षेत्र यांची तुलना करता दहा आरपर्यंत जमीनक्षेत्र असणारांमध्ये १८ (१९·३५ टक्के) शेतमजूर तर १९(२०·४३ टक्के) वडीलांचासमावेश होतो· अकरा ते वीस आरपर्यंत जमीन असणारांमध्ये एकवीस (२२·५८ टक्के) शेतमजूर व आठ (८·६० टक्के) वडील, एकवीस ते तीस आर जमीन गटामध्ये बारा (१२·९० टक्के) शेतमजूर तर दहा (१०·७५ टक्के) वडील, ३१ ते ४० आर गटात अठरा (१८·३५ टक्के) शेतमजूर व चौदा (१५·०५ टक्के) वडील तसेच ४१ ते ५० आर या गटात तीन (३·२३ टक्के) शेतमजूर व पाच (५·३८ टक्के) वडील आहेत· ५१ ते ६० आर या गटात सहा (६·४५ टक्के) शेतमजूर व आठ (८·६० टक्के) वडील, ६१ आर ते एक हेक्टर या गटात एक (१·०७ टक्के) शेतमजूर व तीन (३·२३ टक्के) वडील आहेत· तसेच १·१ हेक्टर ते दोन हेक्टर या जमीन गटात चौदा (१५·०५ टक्के) वडील असताना फक्त दोन (२·१५ टक्के) शेतमजूर आहेत· तर २·१ हेक्टरपेक्षा जास्त जमीन गटात फक्त चार वडीलांचाच समावेश आहे· तर एकही अल्पभू-धारक शेतमजूर नाही·

···· ३६/-

छोडक्यात अकरा ते वीस आर,एक्वीस ते तीस आर, एकतीस ते चाळीस आर, ५१ ते ६० ह आर, या जमीन गटात शे संख्या जास्त आहे तर दहा आर पर्यंत ४१ ते ५० आर, ६१ ते ८० व त्यावरील सर्व गटांमध्ये शेतमजुरापेक्षा वडीलांची संख्या जास्त विशेष करुन २·१ हेक्टरपेक्षा जास्त या गटामध्ये फक्त शेतमजुर वडीलांचाच समावेश होतो·

तक्ता क्र. ३.४

## भूमिहीन शेतमजुरांच्या जमीन मालकीचा तुलनात्मक तक्ता

| अ.नं. | शेतमजुरांच्या जमिनीचे - क्षेत्रफळ | शेतमजुराच्या वडीलांच्या जमीनीचे क्षेत्रफळ (आर मध्ये) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जमिन नाही | ३१ ते ४० | ६१ ते ८० | ८१ ते १ हेक्टर | १.०१ हेक्टर ते २ हेक्टर | २.०१ हेक्टर पेक्षा जास्त | एकूण |
| स्तंभ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | जमिन नाही | १५<br>(६६.१८) | ३<br>(१३.६४ | १<br>(४.५५) | १<br>(४.५५) | १<br>(४.५५) | १<br>(४.५५) | २२<br>१०० % |

..... ३८/-

भूहीन बावीस शेतमजुरांपैकी पंधरा (६८·१८ टक्के) शेतमजुरांच्या वडीलांकडे जमीनी नाहीत ( या गटातील सर्व - शेतमजुरांना जमीनी नाहीत) म्हणजे ते भूहीन वडीलांचे भूहीन पुत्र आहेत· परंतु सात (३१·८२ टक्के) भूहीन शेतमजूर वडीलांची जमीन असूनदेखील ते भूहीन आहेत· ते आपणास तक्ता क्र· ३·४ वरून स्पष्ट होते·

## छाडकरी शेतमजुरांच्या जमीन मालकाचा तुलनात्मक तक्ता

| अ.नं. | शेतमजुरांच्या जमीनीचे क्षेत्रफळ (आर मध्ये) | शेतमजुराच्या वडिलांच्या जमीनीचे क्षेत्रफळ ( आर मध्ये ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जमीन नसलेले | ११ ते २० | ६१ ते ८० | १.०१ हेक्टर ते २ हेक्टर | २.०१ हेक्टर पेक्षा जास्त | एकूण |
| स्तंभ क्र. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | ११ ते २० | १<br>१०० %<br>१०० % | | | | | १<br>(१०० %)<br>(२०.००) |
| २. | ३१ ते ४० | | | १<br>१०० %<br>१०० % | | | १<br>(१०० %)<br>(२०.००) |
| ३. | ४१ ते ५० | | | | १<br>१०० %<br>१०० % | | १<br>(१०० %)<br>(२०.००) |
| ४. | ८१ ते १ हेक्टर | | | | | १<br>१०० %<br>१०० % | १<br>(१०० %)<br>(२०.००) |
| ५. | १.०१ हेक्टर ते २ हेक्टर | | १<br>१०० %<br>१०० % | | | | १<br>(१०० %)<br>(२०.००) |
| ६. | एकूण | १<br>(२०.००)<br>(१०० %) | १<br>(२०.००)<br>(१०० %) | १<br>(२०.००)<br>(१०० %) | १<br>(२०.००)<br>(१०० %) | १<br>(२०.००)<br>(१०० %) | ५<br>१०० %<br>(१०० %) |

खांडकरी शेतमजूर :

तक्ता क्र.३.५ चे निरीक्षण केल्यास असे दिसून येते की, या गटातील पाच शेतमजुरांपैकी एक (२० टक्के) शेतमजूर असे आहेत, ज्यांच्या वडीलांना जमीन नव्हती परंतु शेतमजुरांकडे मात्र अकरा ते वीस आर जमीन कसण्यासाठी आहे. ३१ ते ४० आर स्वत:कडे कसण्यासाठी जमीन असणा-या एका (२० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांकडे ६१ ते ८० आर जमीन होती. खांडाने ४१ ते ५० आर जमीन कसणा-या एका (२० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांचे जमीनक्षेत्र १.१ हेक्टर ते दोन हेक्टर तर ८१ आर ते एक हेक्टर जमीन कसणा-या एका (२० टक्के ) शेतमजुराच्या वडीलाच्या जमीनक्षेत्र ११ ते २० आर आहे.

एकंदरीत पहाणी करुन असे निदर्शनास येते की या गटातील पाच शेतमजुरांपैकी एका (२० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांकडे जमीन नव्हती, परंतु चार (८० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांकडे जमीन असूनही ते खांडकरी शेतमजूर बनले आहेत.

जिरायत बागायत :

सर्व अल्पभूधारक, खांडकरी शेतमजुरांच्या बाबत असे आढळून आले आहे की, त्यांच्याकडे असणारी सर्व जमीन जिरायत आहे. (तक्ता क्र. ३.२) परंतु त्यांच्या वडीलांच्या जमीनीचा विचार केल्यास असे दिसून येते की, ९३ अल्प-भू-धारक शेतमजुरांपैकी ८५ (९१.४० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांची सर्व जमीन जिरायत होती. चार (४.३० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांच्या जमीनीपैकी ६० टक्के जमीन जिरायत होती. तर चार (४.३० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांच्या जमीनीपैकी ७० टक्के जमीन जिरायत होती.

....४१/-

आठ (८·६० टक्के) अल्प भू-धारक शेतमजुरांच्या वडीलांच्या जमीनीपैकी सरासरी ३५ टक्के जमीन बागायत परंतु शेतमजुराकडील सर्व - जमीनी मात्र पूर्ण जिरायत आहेत·

बावीस भूहीन शेतमजुरांपैकी १५ (६८·१८ टक्के) शेतमजुरांच्या वडीलांकडे जमीन नव्हती· तर उरलेल्यापैकी एका (४·५५ टक्के) शेतमजुरांच्या वडीलांकडे ५० टक्के जमीन जिरायत होती· दुस-या एका (४·५५ टक्के) शेतमजुरांच्या वडीलांकडे ८० टक्के जमीन जिरायत होती तर पाच (२२·७३ टक्के) शेतमजुरांच्या वडीलांची सर्व जमीन जिरायत होती·

भूहीन शेतमजुरांमध्ये दोन (९·०९ टक्के) शेतमजुरांच्या वडीलांची सरासरी ३५ टक्के जमीन बागायत होती· परंतु मुले भूहीन शेतमजूर बनली आहेत·

पाच खंड-करी शेतमजुरांमधील एका (२० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांना जमीन नव्हती· एका (२० टक्के) शेतमजुराच्या वडीलाकडील सर्व जमीन जिरायत आहे· दुस-या एका (२० टक्के) शेतमजुराच्या वडीलां कडील जमीनीपैकी ६० टक्के जमीन जिरायत होती· तर उरलेल्या दोन (४० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांच्या जमीनीपैकी ८० टक्केपेक्षा जास्त जमीन जिरायत होती·

खंडकरी शेतमजुरांमधील तीन (६० टक्के) शेतमजुरांच्या वडीलांच्या जमीनीपैकी सरासरी २६·६७ टक्के जमीनी बागायत होत्या·

8251
A.

.....४२/-

तक्ता क्र. ३.६

शेतमजूर कुटुंबाचे आकारमान ( व्यक्ती )

| अ.नं. | शेतमजुराच्या कुटुंबाचे आकारमान (व्यक्ती) | अल्पभूधारक शेतमजूर | | भूमिहीन शेतमजूर | | खंडकरी शेतमजूर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| स्तंभ क्र. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | १ ते २ | ७ | ७.५३ | | | | | ७ | ५.८३ |
| २. | ३ | १२ | १२.९० | २ | ९.०९ | | | १४ | ११.६७ |
| ३. | ४ | ३० | ३२.२६ | ६ | २७.२७ | २ | ४०.०० | ३८ | ३१.६७ |
| ४. | ५ | २५ | २६.८८ | ८ | ३६.३६ | ३ | (६०.००) | ३६ | ३०.०० |
| ५. | ६ | १५ | १६.१३ | ४ | १८.१८ | | | १९ | १५.८३ |
| ६. | ७ व ७ पेक्षा जास्त | ४ | ४.३० | २ | ९.०९ | | | ६ | ५.०० |
| ७. | एकूण | ९३ | १०० % | २२ | १०० % | ५ | १००% | १२० | १०० % |

३.६.१ : कुटुंबाचे आकारमान :

तक्ता क्र. ३.६ चे निरिक्षण केले असता असे निदर्शनास येते की, ९३ अल्पभू-धारक शेतमजुरांच्यापैकी सात (७.५३ टक्के) कुटुंबामध्ये एक ते दोन व्यक्ती आहेत. बारा (१२.९० टक्के) शेतमजुर कुटुंबामध्ये तीन व्यक्ती तीस (३२.२६ टक्के) शेतमजुरांच्या कुटुंबामध्ये चार व्यक्ती पंचवीस (२६.८८ टक्के) शेतमजुरांच्या कुटुंबामध्ये पाच व्यक्ती,तर सहा व्यक्ती आणि सात व सातपेक्षा अधीक व्यक्ती कुटुंबामध्ये असणा-या शेतमजुरांचे प्रमाण अनुक्रमे पंधारा (१६.३३ टक्के) आणि चार (४.३० टक्के) आहे.

यामध्ये चार व पाच व्यक्ती असे कुटुंबाचे आकारमान असणा-या शेतमजुरांचे प्रमाण ५५ (५९.१४ टक्के) आहे.

वीस शेतमजुरांमधील दोन (९.०९ टक्के) शेतमजुरांच्या कुटुंबाचे आकारमान तीन व्यक्तीचे, सहा (२७.२७ टक्के) शेतमजुरांच्या कुटुंबामध्ये चार व्यक्ती, तसेच कुटुंबामध्ये सदस्य व्यक्ती पाच असणा-या शेतमजुरांचे प्रमाण आठ (३६.३६ टक्के) आहे. तर सहा व्यक्ती आणि सात व - सातपेक्षा जास्त व्यक्तीचे कुटुंब असणा-या शेतमजुरांचे प्रमाण अनुक्रमे चार (१९.१८ टक्के) आणि दोन (९.०९) टक्के) आहे.

यामध्ये चार व पाच व्यक्तीचे कुटुंब असणा-या शेतमजुराचे प्रमाण चौदा (६३.६४ टक्के) आहे.

पाच खांडकरी शेतमजुरांमधील दोन (४० टक्के) शेतमजुरांच्या कुटुंबाचे आकारमान चार व्यक्तीचे तर तीन (६० टक्के) शेतमजुरांच्या - कुटुंबामध्ये पाच व्यक्ती आहेत.

.... ४४/-

एकूण १२० शेतमजुरांमध्ये असे आढळून येते की ज्यांच्या कुटुंबाचे आकारमान चार व पाच व्यक्ती आहेत अशा शेतमजुरांचे प्रमाण - ७४(६१·६७ टक्के) आहे· अल्पभू-धारक, भूहीन, व खंडकरी या तीन गटातील शेतमजुरांच्या कुटुंबाच्या आकारमानाची तुलना केली असता असे दिसून येते की भूहीन कुटुंबामध्ये मोठे कुटुंब (पाचपेक्षा जास्त) असणाऱ्या प्रमाण सर्वात जास्त म्हणजे २७·२७ टक्के असून अल्पभू-धारक शेतमजुरांमध्ये ते प्रमाण थोडेसे कमी म्हणजे (२०·४३ टक्के) आहे· खंडकरी शेतमजुरांमध्ये कोणाचेही कुटुंब मोठे नाही·

## ३·७·० : शेतमजूर कुटुंबाची साक्षरता :

सर्व शेतमजुरांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांच्या शिक्षणाचे प्रमाण कसे आहे· हे आपणास त्यांच्या शैक्षणिक पातळीवरुन व व्यक्तीगत - पातळीवरुन पुढीलप्रमाणे पहाता येईल·

## ३·७·१ : अल्पभू-धारक शेतमजूर :

अल्प-भू-धारक शेतमजूर कुटुंबामधील सर्व व्यक्तींची संख्या ३९४ आहे· त्यांची शैक्षणिक पातळीवर विभागणी केल्यास असे दिसून येते की, १८८ (४७·२२ टक्के) व्यक्ती अशिक्षित आहेत· यामध्ये ३७(१९·६८ टक्के) शेतमजूर स्वत:,६२ (३२·९८ टक्के) पत्नी, २७ (१४·३७ टक्के) मुले, २१ (११·७४ टक्के) मुली, ८(४·२६ टक्के) वडील, २९(१५·४३ टक्के) माता, व चार (२·१३ टक्के) बहीण भाऊ यांचा समावेश होतो· प्राथमिक - शिक्षण घेणाऱ्यामध्ये १४१ (३५·७८टक्के) व्यक्तींचा समावेश होतो· यामध्ये ४६ (३२·६२ टक्के) शेतमजूर स्वत:,१३ (९·२२ टक्के) पत्नी, - ४३ (३०·५० टक्के) मुले, ३१ (२९·९९ टक्के) मुली, तीन (२·१३ टक्के)

वडील, तर पाच (३·५५ टक्के) बहीण भाऊ यांचा समावेश होतो· माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या ४६ (११·६८ टक्के) व्यक्तीमध्ये. - सहा (१३·०४ टक्के) शेतमजूर स्वत:, एक (२·१७ टक्के) पत्नी, - २६ (५६·५२ टक्के) मुले, दहा (२१·५४ टक्के) मुली तर तीन (६·५२ टक्के) बहीण भाऊ यांचा समावेश होतो· उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या अठरा (४·५७ टक्के) व्यक्तीमध्ये चार (२२·२२ टक्के) शेतमजूर स्वत: तर चौदा (७७·७८ टक्के) मुले आहेत· महाविद्यालयीन शिक्षण घेणारी एक (०·२५ टक्के) व्यक्ती आहे· त्यामध्ये मुलाचाच समावेश होतो·

या आकडेवारीची व्यक्तीगत पातळीवर विभागणी केल्यास असे दिसून येते की ९३ शेतमजूर कुटुंब प्रमुखांपैकी ३७ (३९·७८ टक्के) अशिक्षित ४६ (४९·४८ टक्के) प्राथमिक तर सहा (६·४५ टक्के) व चार (४·३० टक्के) अनुक्रमे माध्यमिक व उच्च माध्यमिकशिक्षण घेतलेले आहेत· अल्पभूधारक शेतमजुराच्या पत्नीचा विचार करता, एकूण स्त्रिया ७६ असून त्यामध्ये ६२(८१·५७ टक्के) अशिक्षित,तेरा (१७·११ टक्के) प्राथमिक तर एक (१·३१ टक्के) माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आहेत· मुलांची संख्या १११ (२८·१७ टक्के) असून त्यात सत्तावीस (२४·३२ टक्के) अशिक्षित आहेत· तर ४३ (३८·७४ टक्के) प्राथमिक,२६ (२३·४२ टक्के) माध्यमिक,चौदा (१२·६१ टक्के) उच्च माध्यमिक तर एका (०·९० टक्के) मुलांचे महाविद्यालयीन शिक्षण झालेले आहे मुली ६२ (१५·७४ टक्के) आहेत· त्यामध्ये २१ (३३·८७ टक्के) अशिक्षित, ३१(५० टक्के) प्राथमिक, दहा (१६·१३ टक्के) माध्यमिक शिक्षित आहेत· वडीलांच्या शिक्षणाचा विचार केल्यास हयात असणाऱ्या अकरा वडीलांपैकी आठ (७२·७३ टक्के) अशिक्षित तर तीन (२७·२७ टक्के) प्राथमिक शिक्षण झालेले आहेत· शेतमजुरांच्या हयात असणाऱ्या २९ म्हणजे सर्व माता अशिक्षित आहेत· भाऊ-बहिण - १२ (३·०५)टक्के यांच्यापैकी चार (३३·३३ टक्के) अशिक्षीत पाच - (४१·६७ टक्के) प्राथमिक तर तीन (२५ टक्के) माध्यमिक शिक्षण झालेले आहेत·

वरील निरीक्षणावरून असा निष्कर्ष निघतो की, पुरुषांमध्ये स्त्रियांपेक्षा साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. स्त्रियांमध्ये प्राथमिक पर्यंतचे सुध्दा शिक्षण घेण्याचे प्रमाण अल्प आहे. तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा विचार करता पुरुषांचेच शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे.

मुलामुलींच्या शिक्षणाचा विचार केल्यास असेच आढळून येते की उच्चमाध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणामध्ये मुलांचीच मक्तेदारी आहे. मुलींना मुख्यत्वे प्राथमिक व जेमतेम माध्यमिक पातळीपर्यंतचेच शिक्षण मिळते.

३.७.२ :

भूहीन शेतमजुरांच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींची संख्या १०८ आहे. त्यांची शैक्षणिक पातळीवर विभागणी केल्यास असे दिसून येते की ५४ (५० टक्के) व्यक्ती अशिक्षित आहेत. त्यापैकी आठ (१४.८१ टक्के) शेतमजूर स्वतः, सतरा (३१.४८ टक्के) पत्नी, नऊ (१६.६७ टक्के) मुले, सात (१२.९६ टक्के) मुली, एक (१.८५ टक्के) वडील, पाच (९.२६ टक्के) माता, तर सात (१२.९६टक्के) भाऊ बहिण आहेत. शिक्षित व्यक्तीपैकी - ४३ (३९.८१ टक्के) प्राथमिक शिक्षण घेतलेल्या असून त्यापैकी चौदा (३२.५६ टक्के) शेतमजूर स्वतः, पाच (११.६३ टक्के) पत्नी, एकोणीस (३०.२३ टक्के) मुले, सहा (१३.९५ टक्के) मुली तीन (६.९८ टक्के) वडील, एक (२.३३ टक्के) माता तर एक (२.३३ टक्के) बहीण-भाऊ आहेत. माध्यमिक शिक्षण घेतलेल्या दहा (९.२६ टक्के) व्यक्तीमध्ये सहा - (६० टक्के) मुले व चार (४० टक्के) मुलींचा समावेश आहे. तर उच्च माध्यमिक शिक्षण घेत असलेली एक (०.९३ टक्के) व्यक्ती म्हणजे मुलेच आहेत.

.... ४८/-

३·७·३ : खांडकरी शेतमजूर :

यामध्ये येणाऱ्या चोवीस व्यक्तींचा विचार केल्यास शैक्षणिक दृष्टया नऊ व्यक्ती अशिक्षित आहेत· त्यापैकी दोन (२२·२२ टक्के) - शेतमजूर स्वत:, तीन त्यांच्या (३३·३३ टक्के) पत्नी, तर मुले, मुली, आई व बहीण भाऊ प्रत्येकी एक (११·११ टक्के) अशिक्षित आहेत· तेरा प्राथमिक शिक्षित व्यक्तीमध्ये तीन (२३·०८ टक्के) शेतमजूर स्वत:, दोन (१९·३८ टक्के) पत्नी, पाच (३८·४६ टक्के) मुले तर मुली, आई व बहीणभाऊ प्रत्येकी एक (७·६९ टक्के) प्राथमिक शिक्षित आहेत - माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकी एक (४·१७ टक्के) व्यक्ती मध्ये मुलांचाच समावेश आहे·

शैक्षणिक पातळीचे व्यक्तीगत पातळीवर पृथःकरण केल्यास असे दिसून येते की पाच शेतमजूर कुटुंब प्रमुखांमध्ये दोन ( ४० टक्के ) अशिक्षित तर तीन (६० टक्के) प्राथमिक शिक्षण घेतलेले आहेत· स्त्रियांमध्ये तीन (६० टक्के) अशिक्षित तर दोन (४० टक्के) प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आहेत· मुलांचा विचार केल्यास आठ मुलांपैकी एक (१२·५० टक्के) अशिक्षित, पाच (६५·५० टक्के) प्राथमिक तर माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण प्रत्येकी एक (१२·५० टक्के) आहे· दोन मुलीपैकी एक (५० टक्के) अशिक्षित तर दुसरी (५० टक्के) प्राथमिक शिक्षण झालेले आहे· त्याचप्रमाणे दोन बहीण-भाऊ व दोन माता यांच्यामध्येही अशिक्षित व प्राथमिक शिक्षितांचे प्रमाण प्रत्येकी एक (५० टक्के) आहे·

यामध्ये स्त्री-पुरुष शिक्षण प्रमाण तुलना करता असे आढळून येते की सुशिक्षितांमध्ये पुरुषांचे प्रमाण ६० टक्के आहे· तर अशिक्षितांमध्ये स्त्रियांचे प्रमाण ६० टक्के आहे·

.... ५०/-

मुलामुलींच्या शिक्षणाचा तुलनात्मक विचार केल्यास असे दिसून येते की मुलींमध्ये अशिक्षितांचे प्रमाण ५० टक्के आहे. तर हे प्रमाण - मुलांमध्ये १२.५० टक्के आहे. मुले, माता, बहीण भाऊ यांच्या सुशिक्षित अशिक्षितांचे प्रमाण समान म्हणजे ५० टक्के आहे.

३.७.४ :

सर्व शेतमजूर व त्यांच्या कुटुंबियांचा विचार करता असे दिसून येते की, शेतमजुरांपैकी खंडकरी शेतमजुरांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण ४० टक्के इतके जास्त आहे. तर भूहीनांमध्ये हे प्रमाण कमी म्हणजे ३६.३६ टक्के आहे. प्राथमिक शिक्षण संदर्भात भूहीन शेतमजुरांचे प्रमाण जास्त ६३.६४ टक्के आहे. अल्पभूधारकामध्ये ते प्रमाण कमी ४९.४६ टक्के आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षीत असणारे सर्व शेतमजूर अल्पभू-धारक शेतमजूर आहेत.

स्त्रियांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण अल्पभूधारकांमध्ये जास्त (८१.५७ टक्के) आहे. तर खंडकरी स्त्रियांमध्ये हे प्रमाण कमी म्हणजे ६० टक्के आहे. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीमध्ये खंडकरांच्या - स्त्रियांमध्ये हे प्रमाण ४० टक्के आढळते. तर अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये हेच प्रमाण कमी म्हणजे १७.११ टक्के आहे. माध्यमिक शिक्षण घेतलेल्या स्त्रिया म्हणजे एक अल्पभूधारक आहे.

मुलांच्या बाबत पहाता अशिक्षितांचे सर्वात जास्त प्रमाण - (३१.०३ टक्के) भूहीनामध्ये तसे सर्वात कमी प्रमाण १२.५० टक्के खंडकरी शेतमजुरांच्या मुलामध्ये आहे. प्राथमिक शिक्षणाच्या बाबत खंडकरी मुलामध्ये हे प्रमाण जास्त (६५.५० टक्के) आढळते. तर अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये हे प्रमाण कमी (३२.७४ टक्के) आहे. माध्यमिक शिक्षणात

.... ५१/-

अल्पभूधारकांच्या मुलामध्ये २३·४२ टक्के तर खंडकरी मुलांच्यामध्ये हे शिक्षण प्रमाण १२·५० टक्के आहे· उच्चमाध्यमिक शिक्षणात - अल्पभूधारकांमधील मुलांचे प्रमाण १२·६१ टक्के तर भूहीनांमध्ये हे प्रमाण ३·४५ टक्के आहे· महाविद्यालयीन शिक्षण घेणारी सर्व मुले अल्पभूधारकांची मुले आहेत·

मुलींच्या शिक्षणाचा विचार केल्यास अशिक्षित मुलीचे जास्त प्रमाण (५० टक्के) खंडकरी शेतमजूर कुटुंबातील मुलीचे तर कमी प्रमाण ३३·८७ टक्के अल्पभू-धारक शेतमजुरांमधील मुलींचे आहे· अल्पभूधारक व खंडकरी या दोन गटातील शेतमजुरांच्या मुलीमध्ये प्रत्येकी समान म्हणजे पन्नास टक्के तर भूहीन शेतमजुरांच्या मुलीमध्ये हे प्रमाण ३५·२९ टक्के आहे· माध्यमिक शिक्षणात फक्त अल्पभूधारक शेतमजुरांच्या मुलींचा समावेश आहे·

वरील दोन शैक्षणिक गटापैकी शेतमजूर व त्यांच्या पत्नी यांच्या शिक्षणाचा विचार केल्यास पुरुषांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे· किंबहुना माध्यमिक व उच्च-माध्यमिक क्षेत्रात पुरुषांचेच प्रमाण (संख्या) अधिक आहे· मुलामुलींच्या शिक्षण गटाचा विचार केल्यास मुलीमध्ये अशिक्षितांचे प्रमाण अधिक आहे· तर माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण गटामध्ये मुलांचे प्रमाण जास्त आहे· महाविद्यालयीन शिक्षण गटामध्ये फक्त मुलेच आहेत·

३·८·० :

शेतमजुरांच्या निवासाबद्दल त्यांची असणारी माहिती गोळा करण्यात आली तसेच त्यांच्याकडे असलेल्या बैल-बैलगाडी, नांगर-औजारे,

.... ५२/-

पेक्षा कमी जमीन असणारे आहेत. सहकारी संस्थेचे सभासद असणा-या व्यक्ती पाच अशा आहेत की ज्यांची जमीन ५० आरपेक्षा कमी आहे. ५० आर पेक्षा कमी जमीन असणा-या शेतमजुरीमध्ये १७ कोंबडया असणारे २० बक-या असणारे व २७ गाई-म्हैशी असणारे शेतमजूर आहेत.

५१ आर ते १ हेक्टर जमीन गटात असणा-या सर्व एकोणीस व्यक्तिंची स्वतःची घरे आहेत. यांच्यामध्ये सहकारी संस्थेचे सभासद असणारे दोन, कोंबडया व बक-या असणारे प्रत्येकी एक व गाई-म्हैशी असणा-या सहा शेतमजुरांचा समावेश होतो.

१.१ हेक्टर ते २ हेक्टर जमीन असणा-या शेतमजुरांपैकी नांगर औजारे तसेच गाई-म्हैशी असणारा प्रत्येकी एक शेतमजूर आहेत.

दहा आरपर्यंत या जमीन गटातील १८ शेतमजुरांमध्ये स्वतःच्या घरामध्ये रहाणा-या शेतमजुरांचे प्रमाण सतरा (९४.४४ टक्के) आहे. ११ ते २० आर गटातील २१ शेतमजरांपैकी स्वतःच्या घरात रहाणा-यांचे प्रमाण १९ जण (९०.४८ टक्के) आहे. तसेच ३१ ते ४० आर गटामधील १८ शेतमजुरांपैकी सतरा जण (९४.४४ टक्के) स्वतःच्या घरात रहातात.

खंडकरी शेतमजु रांच्याकडे बैल-बैलगाडी, नांगर-औजारे, सहकारी संस्था सभासदत्व, कोंबडया, बक-या, गाई, म्हैशी यापैकी काहीही नाही. घराच्या बाबतीत असे आढळून येते की या गटात असणा-या पाच शेतमजुरांपैकी ४१ ते ५० आर व १.१ हेक्टर ते दोन हेक्टर जमीन - असणां-यापैकी दोन (४० टक्के) शेतमजुरांची घरे भाडयाची तर तीन (६० टक्के) शेतमजुरांची घरे स्वतःची आहेत.

३.८.२ :

घरे व प्राण्यांची मालकी या संबंधात गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण शेतमजुरांच्या शैक्षणिक माहितीच्या संदर्भात मांडले असता पुढील गोष्टी स्पष्ट होतात.

अशिक्षित असणा-या अडतीस अल्पभू-धारक शेतमजुरांपैकी ३६ (९४.७४ टक्के) शेतमजूर स्वत:ची घरे असणारे तर दोन (५.२६ टक्के) भाड्याची घरे असणारे शेतमजूर आहेत. दोन बैलगाडी व नांगर औजारे असणारे, तीन सहकारी संस्थांचे सभासद आहेत. आठजणांकडे कोंबडया, सातजणांकडे बक-या तर आठ जणांकडे गाई-म्हैशी आहेत.

प्राथमिक शिक्षण झालेल्या ४४ शेतमजुरांपैकी छप्परात व भाड्याच्या घरात रहाणा-या शेतमजुरांचे प्रमाण प्रत्येकी २.२७ टक्के आहे.प्राथमिक शिक्षीत शेतमजुरांमध्ये बैल-बैलगाडी,नांगर-औजारे,असणारे प्रत्येकी तीन शेतमजूर आहेत तर नउ कोंबडया असणारे,तेरा बक-या असणारे व बावीस गाई-म्हैशी जवळ असणारे आणि तीन सहकारी संस्थांचे सभासद आहेत.

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण गटामध्ये अनुक्रमे सात व चार शेतमजूर स्वत:ची घरे असणारे आहेत. माध्यमिक शिक्षितामध्ये कोंबडया,बक-या असणारे प्रत्येकी एक तर गाई-म्हैशी असणारे दोन शेतमजूर आहेत. उच्चमाध्यमिक शिक्षीत एक व्यक्ती सहकारी संस्थेची सभासद आहे. तर दोन गाई-म्हैशी असणारे शेतमजूर आहेत.

अशिक्षीत व प्राथमिक शिक्षित शेतमजुरामध्ये भाड्याच्या घरी व छप्परात रहाणारे शेतमजूर आहेत परंतु त्यांच्याकडे बैल-बैलगाडी नांगर-औजारे तसेच कोंबडया बक-या गाई-म्हैशी असणा-यांचे प्रमाण ८५ टक्के पेक्षा जास्त आहे.

.... ५५/-

बावीस भूहीन शेतमजुरांमध्ये बैल-बैलगाडी, नांगर-औजारे, कोणाकडेच नाहीत व सहकारी संस्थेचे सभासद कोणीही नाही. तर दोन शेतमजुरांकडे कोंबड्या, पाच शेतमजुरांकडे बक-या, व सहा शेतमजुरांकडे गाई-म्हैशी आहेत.

भूहीन सात अशिक्षित शेतमजुरांपैकी तीन (४२.८६ टक्के) स्वत:चे घर असणारे तर चार (५७.१४ टक्के) भाडेकरू शेतमजूर आहेत. यामध्ये प्रत्येकी एकजण बकरी, एकजण गाई-म्हैशी असणारे आहेत.

प्राथमिक शिक्षित पंधरा शेतमजुरांपैकी एकजण (६.६७ टक्के) छप्परात रहाणारा, दोन (१३.३३ टक्के) भाडेकरू तर बाराजण - (८० टक्के) स्वत:चे घर असणारे आहेत. तसेच कोंबड्या असणारे दोन बक-या असणारे चार तर गाई-म्हैशी असणारे पाच शेतमजूर आहेत.

भूहीन प्राथमिक शिक्षितांमध्ये स्वत:चे घर असणारांचे प्रमाण जास्त आहे. पाच छांडकरी शेतमजुरांमध्ये दोन अशिक्षित शेतमजुरांपैकी एकजण (५० टक्के) स्वत:चे घर असणारे तर एकजण (५० टक्के) - भाड्याच्या घरात रहाणारे आहेत. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या तीन शेतमजुरांपैकी दोन (६६.६७ टक्के) स्वत:चे घर असणारे तर एकजण (३३.३३ टक्के) भाड्याच्या घरात रहाणारे आहेत. प्राथमिक शिक्षित शेतमजुरांमध्ये स्वत:चे घर असणारांचे प्रमाण जास्त आहे.

सर्व १२० शेतमजुरांच्या पहाणीवरून असा निष्कर्ष निघतो की अशिक्षित शेतमजुरांमध्ये भाड्याच्या घरात रहाणा-या शेतमजुरांची संख्या सुशिक्षित शेतमजुरांपेक्षा जास्त आहे. छप्परामध्ये रहाणारे दोन्हीही (अल्पभूधारक एक व भूहीन एक ) प्राथमिकशिक्षित शेतमजूर आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्यामध्ये सर्वजण स्वत:ची घरे असणारे आहेत.

...५६/-

३·८·३ : कुटुंबाचे आकारमान :

निवाससंबंधी व पक्षी प्राणी यांच्या मालकीबद्दलची माहिती कुटुंबाच्या आकारमानाच्या संदर्भात मांडली असता येणारे निष्कर्ष - अभ्यासाला सहाय्यभूत ठरणारे आहेत·

अल्पभूधारकांमध्ये एक ते दोन व्यक्तींचे कुटुंब असणाऱ्या सात शेतमजुरांमध्ये सहा (८५·७१ टक्के) स्वतःची घरे असणारे व एक - (१९·२९ टक्के) भाडयाच्या घरात रहाणारे आहेत· त्यांच्यामध्ये बकऱ्या असणारे दोन तर गाई-म्हैशी असणाऱ्या एका शेतमजुराचा समावेश आहे· तीन व्यक्तींच्या कुटुंबामध्ये सर्वच्या सर्वजण म्हणजे बाराजण स्वतःची घरे असणारे शेतमजूर आहेत· त्यापैकी दोघे सहकारी संस्थांचे सभासद आहेत· तर कोंबडया,बकऱ्या व गाई-म्हैशी असणाऱ्या - शेतमजुरांची संख्या अनुक्रमे एक, एक व चार आहे· चार व्यक्तींच्या कुटुंबात येणाऱ्या तीस शेतमजुरांपैकी एकजण (३·३३ टक्के) छप्परात रहाणारे, एकजण (३·३३ टक्के) भाडेकरु तर २८ (९३·३३ टक्के) स्वतःचे घर असणारे आहेत· त्यांच्यामध्ये बैल-बैलगाडी असणारे एक, नांगर-औजारे असणारे एक,व सहकारी संस्थेचे सभासद असणारे दोन शेतमजूर आहेत· कोंबडया,बकऱ्या,गाई-म्हैशी असणारे शेतमजूर अनुक्रमे चार-पाच व बारा आहेत· पाच व्यक्ती असणाऱ्या पंचवीस कुटुंबातील चोवीसजण (९६ टक्के) स्वतःचे घर असणारे तर एक (४ टक्के) भाडयाचे घर असणारे शेतमजूर आहेत· यामध्ये बैल-बैलगाडी नांगर-औजार असणारे दोन जण आहेत· तर एक अल्पभू-धारक शेतमजूर सहकारी संस्था सभासद आहे· तसेच कोंबडया असणारे ७, बकऱ्या असणारे ९, तर गाई-म्हैशी असणारे ४ शेतमजूर आहेत· सहा व्यक्तीच्या पंधरा कुटुंबातील सर्वजण स्वतःचे घर असणारे शेतमजूर आहेत· यांच्यामध्ये बैल-बैलगाडी,नांगर-औजारे,प्रत्येकी एक व सहकारी संस्थेचे सभासद असणारे दोन शेतमजूर आहेत· तसेच

.... ५७/-

कोंबड्या बक-या व गाई-म्हैशी असणा-या शेतमजुरांची संख्या अनुक्रमे पाच,तीन व दहा आहे. सात व्यक्तीपेक्षा जास्त व्यक्ती असणा-या कुटुंबामध्ये सर्वजण (चार) स्वत:चे घर असणारे आहेत. यामध्ये बैल-बैलगाडी व नांगर औजारे असणारे प्रत्येकी एका शेतमजुराचा समावेश आहे.

सर्वसाधारणपणे चार पांच व सहा व्यक्ती असणा-या - कुटुंबामध्ये बैल-बैलगाडी,नांगर-औजारे,तसेच पशु व पक्षांची संख्या जास्त आहे आणि सहकारी संस्थेच्या सभासदत्वाचे प्रमाण जास्त आहे.

बावीस भूहीन शेतमजुरांमध्ये तीन व्यक्तींच्या कुटुंबामध्ये दोन शेतमजुर कुटुंबाचा समावेश होतो पैकी एकाचे स्वत:चे घर तर दुसरा एक भाड्याच्या घरात रहातो. त्यांच्याकडे पशुपक्षी नाहीत. चार व्यक्तींचे कुटुंब असणा-या सहा शेतमजुरांमध्ये चौघे (६६.६७ टक्के) स्वत:चे घर असणारे तर दोघे (३३.३३ टक्के) भाड्याच्या घरात रहाणारे आहेत. या शेतमजुरांमध्ये एक शेतमजुरांकडे बक-या तर एकाकडेच गाई-म्हैशी आहेत. पाच व्यक्तीचे कुटुंब असणा-या आठ शेतमजुरांपैकी सातजण (८७.५० टक्के) स्वत:चे घर असणारे तर एक (१२.५० टक्के) भाड्याच्या घरात रहाणारे आहेत. त्यांच्यामध्ये कोंबड्या,बक-या असणारे प्रत्येकी दोघे तर गाई-म्हैशी असणारे तीन शेतमजूर आहेत. सहा व्यक्ती असणा-या चार कुटुंबामध्ये दोघेजण (५० टक्के) स्वत:च्या घरात तर उरलेले दोघे (५० टक्के) भाड्याच्या घरी राहतात. या शेतमजुरांपैकी प्रत्येकी दोन शेतमजुरांकडे बक-या व गाई-म्हैशी आहेत. सातपेक्षा जास्त व्यक्ती संबंधीत दोन शेतमजूर कुटुंबापैकी एकजण - स्वत:च्या घरी राहतात. तर दुसरे भाड्याच्या घरात रहातात. यामध्ये एकाच शेतमजुराकडे बक-या आहेत.

.... ५८/-

सर्वसाधारणपणे चार, पाच व सहा व्यक्तींच्या कुटुंबामध्ये पशुपक्षी यांची संख्या जास्त आहे·

पाच खंडकरी शेतमजुरांमध्ये चार व्यक्तीचे कुटुंब असणा-या दोन शेतमजुरांकडे सर्वांचे स्वत:चे घार आहे· तर पाच व्यक्तीचे कुटुंब असणा-या तीन शेतमजुरांमध्ये दोघे (६६·६७ टक्के) भाड्याच्या घरात व एकजण (३३·३३ टक्के) स्वत:च्या घरात रहाणारे आहेत· त्यांच्यापैकी कोणाकडेही पशुपक्षी नाहीत· तसेच त्यांच्यापैकी कोणीही सहकारी संस्थेचे सभासद नाहीत·

सर्व १२० शेतमजुरांचा अभ्यास करुन असे दिसून येते की, - अल्पभूधारकामध्ये स्वत:चे घार असणारांचे प्रमाण सर्वात जास्त - (९५·७० टक्के) आहे· त्याखालोखाल ते भूहीन शेतमजुरांमध्ये (६८·१८ टक्के) आहे· तर खंडकरी शेतमजुरांमध्ये हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे साठ टक्के आहे· भाड्याच्या घरात रहाणा-या शेतमजुरामध्ये खंडकरी शेतमजुरांचे प्रमाण जास्त (४० टक्के) आहे भूहीनामध्ये ते प्रमाण कमी (२७·२८ टक्के) व अल्पभूधारकांमध्ये हे सर्वात कमी (३·२२ टक्के) आहे·

अल्पभू-धारकांमध्ये, बैल-बैलगाडी, नांगर-औजारे व पशुपक्षी असणा-यांचे प्रमाण कमी क्षेत्रफळाची जमीन असणा-यात जास्त आहे·

## ३·९·० : उत्पन्नवरुन :

निवास, औजारे, जनावरे व पक्षी यांची गोळा केलेली माहिती शेतमजुरांच्या उत्पन्नाच्या संदर्भात मांडून या सदरात चर्चा केली आहे· उत्पन्न पहाणीवरुन असे दिसून येते की अल्प-भू-धारक शेतमजुरांमध्ये कमी उत्पन्न गटामध्ये स्वत:चे घार असणारांचे प्रमाण कमी नाही· बैल-बैलगाडी, नांगर-औजारे मात्र दरसाल ५००० रुपयापेक्षा जास्त उत्पन्न असणा-यांकडेच आहेत· प्राणीपक्षीसुद्धा ५००० रुपये उत्पन्नपासून वाढत

जावून ७००० रुपये पुढील उत्पन्न गटात कमी झालेले आहे. भूहीन - शेतमजुरांमध्ये ५००१ ते ५५०० रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या गटातच ब भाडयाच्या घरात रहाणारे व छप्परात रहाणारे शेतमजुर आहेत. प्राणी व पक्षी असणाऱ्यांचे प्रमाण वरील उत्पन्न गटात जास्त आहे. भूहीनांकडे बैल-बैलगाडी, नांगर-औजारे नाहीत.

या सर्व १२० शेतमजुरांच्या उत्पन्न गटानुसार निवासाची स्थिती पाहिली असता साधारणपणे ३,००० रुपये पेक्षा कमी व ३,५०१ ते - ५,५०० रुपये या उत्पन्न गटातील शेतमजूर वगळता बाकी सर्व उत्पन्न गटातील सर्व शेतमजूर स्वतःच्या घरी रहातात जास्त उत्पन्न गटाच्या शेतमजुरांकडे प्राणी पक्षी आहेत. म्हणून ते वरील उत्पन्न गटात आहेत असे म्हणणे जास्त संयुक्तीक ठरेल.

३.१० :

या प्रकरणात शेतमजुरांच्या प्राथमिक माहितीच्या आधारे घेतलेल्या आढाव्यावरुन असे दिसून येते की, बहुतेक सर्व शेतमजुर कामेरी गावचेच असून त्यात पुरुषांचे प्रमाण जास्त आहे. त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण ६१.६६ टक्के आहे. बहुतेक सर्व शेतमजुर हिंदू आहेत.तीन-चतुर्थांश अल्पभूधारक व खंडकरी शेतमजुरांकडे अर्ध्या हेक्टरपेक्षा कमी, वीस टक्के शेतमजुरांकडे अर्धा ते एक हेक्टर व फक्त तीन (३.०१) शेतमजुरांकडेच १ ते २ हेक्टर जमीन आहे. शेतमजुरांची भौगोलीक गतिशिलता फारच अल्प आहे. मागील पिढीपेक्षा या पिढीत शैक्षणिक पातळी सुधारलेली आहे. शेतमजुरांकडील जमीनीचे प्रमाण मागील पिढीपेक्षा कमी झालेले आहे. ६२ टक्के शेतमजुरांच्या कुटुंबाचे आकारमान चार ते पाच व्यक्तीचे आहे. म्हणजे शेतमजुरांची कुटुंबे आकाराने मोठी नाहीत. शेतमजुरांच्या

कुटुंबातील सभासदांची शैक्षणिक पातळी वाढत असली तरी -
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात मुलांचीच मक्तेदारी दिसून
येते· मुलींना प्राथमिक शिक्षणापलीकडे संधी मिळत नाही·
९० टक्के शेतमजुरांची स्वत:ची घरे आहेत· बैल-बैलगाडी, नांगर -
औजारे असणारे शेतमजूर फक्त अल्पभूधारक शेतमजुरांमध्येच आहेत·
परंतु त्यांचे प्रमाण फारच अल्प आहे· सहकारी संस्थांचे सभासद
फक्त अल्प भूधारक असले तरी त्यांचे प्रमाण नगण्य आहे· गाई-म्हैशी
शेळ्या ही जनावरे व कोंबड्या बहुतेकाकडे नाहीत· यावरून एकूण
आर्थिक दारिद्रयाची कल्पना येते·

. . . . . .